## <u>दिनांक ०४/१२/२०२५</u>

## <u>निशाणी क्र.२०१ वरील आदेशान्वये साक्षीदार क्र.१ चंद्रकात रंभाजी मोटे यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र. १८ तर्फे टी.आर. कुलकर्णी माडगुळकर यांच्यामार्फत सुरु –</u>

**०४.** आटपाडी येथील गट क्र.५३/२ चा चालू ७/१२ उतारा आणि खाते–उतारा मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उतारा आणि खातेउता–यावर प्रतिवादी क्र.१८ विद्या गुरूदेव देशमुख हिचे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडून मिळकत खरेदी घेतल्यानंतर प्रतिवादी क्र.१८ यांचे नाव ७/१२ उता–यावर आले आहे. हे मला माहित नाही की प्रतिवादी क्र.१८ यांच्या नावाची नोंद ७/१२ दप्तरी फेरफार क्र.२६०४६ अन्वये झाली किंवा कसे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.१८ च्या खरेदीखताचा फेरफाराविरुध्द मी प्रांत कार्यालयामध्ये अपिल दाखल केलेले आहे किंवा कसे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ ने नोंदणीकृत विक्रीपत्राआधारे प्रतिवादी क्र.१८ यांना मिळकत विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१८ यांनी मिळकत खरेदी घेण्यापूर्वी गट क्र.५३/२ च्या ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची नोंद होती. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची नोंद महसूल दप्तरी झाली होती, त्याच्याविरुध्द मी प्रांत कार्यालयामध्ये अपिल दाखल केले आहे. त्याच्या प्रती मी न्यायालयात सादर करण्यास तयार आहे.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५३/२ चे संपूर्ण क्षेत्र २ हे. ०६आर

इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी प्रतिवादी क्र.१८ यांनी ०.०६आर इतके क्षेत्र खरेदी घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१८ यांचे गट क्र.५३/२ ला लागून गट क्र. ५३/१ ही शेतजमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१८ यांच्या हक्कात झालेले खरेदीपत्र हे दिनांक ०४/०३/२०२१ रोजीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खरेदीपत्रापासून प्रतिवादी क्र.१८ यांचा त्या मिळकतीवर कब्जा आहे. हे मला माहित नाही की, सदर खरेदीपत्राच्या मोबदल्यात प्रतिवादी क्र.१८ ने प्रतिवादी क्र. १ व २ यांना रु.६,३०,०००/– रुपये मोबदला रक्कम दिली आहे किंवा कसे. मी प्रतिवादी क्र.१८ विद्या यांचे खरेदीपत्र वाचलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीपत्र नेमके कशासाठी झाले हे देखील मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीपत्र मी वाचले नसल्यामुळे मला खरेदीपत्राबाबत काहीही माहिती नाही.

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, केवळ विधिज्ञांनी सांगितले की,''पक्षकार करावे लागते'' म्हणून मी प्रतिवादी क्र.१८ला पक्षकार केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, संपूर्ण खरेदीपत्र न वाचता मी प्रतिवादी क्र.१८ यांना पक्षकार केलेले आहे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.१८ ने देखील ७/१२ उतारा पाहून खरेदीपत्र केले होते किंवा कसे.

**०८.** मी या ५ ते ७ वर्षामध्ये ''खरेदीपत्र करु नका'' अशी वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस दिली नव्हती. हे मला आठवत नाही की, मी या ५ ते ७ वर्षामध्ये निबंधक कार्यालयामध्ये जावून दावा प्रलंबित असल्याबाबतची नोंद नियमाप्रमाणे केली होती किंवा कसे. मी मागील ४ ते ५ वर्षांमध्ये गट क्र.५३/२ मध्ये दावा प्रलंबित आहे अशा आशयाची पाटी लावली नव्हती. हे म्हणणे खरे

नाही की या सर्व बाबी करण्यास मला अडचण नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीचे मूळ मालक पांडूरंग कृष्णा पाठक हे होते. हे म्हणणे खरे नाही की पाठक आणि भिमराव यांचेदरम्यान कुळाच्या केसेस चालल्या होत्या. हे म्हणणे बरोबर होणार नाही की, त्यांचेदरम्यान कोणत्याच कुळाची प्रकरणे चालली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की,पाठक आणि भिमराव यांच्यामध्ये बरीचवर्षे केस चालल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या प्रकरणामध्ये तडजोड हुकूमनामा तयार झाला. हे मला माहित नाही की, कुळकायद्याप्रमाणे ३२ ग प्रमाणे किमत भरुन ३२एम चे प्रमाणपत्र भिमरावच्या नावे मिळाले किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, भिमरावचे नाव ७/१२ उता–याला लागले होते. भिमराव यांचे नाव ७/१२ दप्तरी लागल्यानंतर त्यांच्या नोंदीबाबत जमाबंदी आयुक्त यांच्याकडे कधीही मी तक्रार दाखल केली नाही.

१०. माझ्या माहितीप्रमाणे भिमरावचे नाव ७/१२ उता–याला नाव लागल्याचे मला सन २००९ मध्ये समजले. मला समजल्यानंतर मी जमाबंदी आयुक्त यांच्याकडे भिमरावचे नाव चुकीचे लागल्याबद्दल तक्रार दाखल केली नाही. साक्षीदार सांगतात न्यायालयात दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, भिमरावच्या पश्चात परत साहेबराव आणि आबा यांचे नाव ७/१२ सदरी लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, भिमरावच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नाव लागले. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाची नोंद चुकीची झाली आहे म्हणून मी प्रांत कार्यालयाकडे कोणतेही अपिल दाखल केलेले नाही.

११. हे मला आता सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्र.१८ चे खरेदीपत्र

प्रतिवादी क्र.१ व २ च्या हिश्यात केले, तर त्यास माझी हरकत आहे किंवा कसे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.१८ ने पैसे देवून, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन खरेदीखत प्रतिवादी क्र १ व २ यांच्याकडून खरेदी घेतले होते किंवा कसे. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१८ यांनी कुळ कायद्याच्या प्रकरणाची माहिती घेवून, जागेवरील प्रतिवादी क्र. १ व २ यांचा प्रत्यक्ष कब्जा पाहून वादग्रस्त मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याकडून खरेदी घेतली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, या कारणास्तव प्रतिवादी क्र.१८ विद्या ही प्रामाणक खनिजदार आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१८ च्या खरेदीपत्राबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवादी क्र.१८ यांच्या खरेदीपत्रामधील नमूद मजकूराबाबत व्यक्तीशः काही माहिती नाही.

**१२.** हे मला माहित नाही की, या खरेदीपत्राबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कधीही तक्रार केली नाही किंवा कसे. हे म्हणणे खरे नाहीकी, माझी या खरेदीपत्राबाबत तक्रार नाही. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ याच्यात प्रापंचिक अडचणी भागविण्याकरीता प्रतिवादी क्र.१८ यांच्या हक्कात खरेदीपत्र करुन दिले किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१८ च्या हक्कात झालेल्या खरेदीपत्राचा आणि माझा काहीही संबंध नाही. हे मला माहित नाही की, प्रतिवादी १८ यांनी वादग्रस्त मिळकत खरेदी घेताना संपूर्ण काळजी घेतली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१८ ने काळजी घेतल्यामुळे प्रतिवादी क्र.१८ तिने खरेदी घेतलेल्या क्षेत्राची मालक आहे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क. १ व २ यांनी प्रांत अधिकारी यांच्याकडे अर्ज देवून गट खुला करुन घेतला होता अगर कसे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी

क्र.१ व २ यांनी गट क्र.५३/२ ची मोजणी करुन घेतली होती किंवा कसे. हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी ४३ ची अट कमी व्हावी म्हणून प्रांताधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, प्रांत अधिकारी यांनी सदर जमिन नजराणा रक्कम भरून खुली केली होती किंवा कसे.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, कुळ कायद्याची महिती न घेता कुळकायदा व त्यामध्ये झालेले प्रांत अधिका–यांसमोरील खटले यांची माहिती न घेता मी प्रतिवादी क्र.१८ यांना या दाव्यात पक्षकार केले आहे. गट क्र.५३/२ मध्ये माझा कब्जा आहे असा दाखविणारे छायाचित्राचा पुरावा याकामात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे नाव गट क्र.५३/२ च्या ७/१२ उता–याला कधीही लागलेले नाही. गट क्र.५३/२ च्या ७/१२ उता–याला माझ्या नावाची नोंद व्हावी म्हणून तहसिलदार किंवा प्रांत अधिकारी यांच्याकडे अर्ज/अपिल दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकत गट क्र.५३/२ वर माझा ताबा आहे या माझ्या तोंडी शब्दाशिवाय इतर कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. माझ्याकडे माझा वादग्रस्त मिळकतीवर कब्जा आहे असा दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

**१४.** हे मला माहित नाही की, खरेदीपत्रापासून प्रतिवादी क्र.१८ ही गट क्र.५३/२ मध्ये जात–येत आहे किंवा कसे. मी विद्याचे पती गुरूदेव यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, विद्या आणि गुरूदेव हे गट क्र.५३/२ मध्ये येत–जात असतात किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र ५३/२ मध्ये नेमका कोणाचा कब्जा आहे याची नेमकी मला माहिती नाही. साक्षीदार सांगतात

आमचा कब्जा आहे.

**१५.** दाव्यामध्ये नमूद केलेल्या वंशावळीला आधारभूत असा कोणताही कागदोपत्री पुरावा या प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोघम वंशावळ नमूद केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१८ ने खरेदी घेतलेली मिळकत एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा या प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. ही मिळकत वाडवडीलार्जीत आहे, एकत्र कुटूंबाची आहे अशी पेपरमध्ये नोटीस दिली होती. ती नोटीस या प्रकरणात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील आणि अतिरिक्त सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.04 16:25:57 +0530

दिनांक –०४.१२.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी.